# हर्सूल कारागृहातील कैद्यांची नेत्र तपासणी

**औरंगाबाद :** लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊनतर्फे २७ ऑगस्ट रोजी हर्सूल कारागृहातील कैद्यांसाठी नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी १६५ बंदिजनांची नेत्र तपासणी करण्यात आली.

४० कैद्यांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी लायन्स क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष सीताराम अग्रवाल, सचिव अनिल माळी, प्रांतपाल राजेश राऊत, वरिष्ठ तुरुंगाधिकारी बी. एस. खराटे, आर. आर. देशमुख, आर. आर. भोसले, डॉ. विनायक हांगे, श्याम गीते, अरुण मदने, डॉ. सुनील कसबेकर, दीपक भुतेकर, कचरू मोरे यांची उपस्थिती होती.